# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ३१

**(सभावृत्तांत)**

दिनांक – १७/१०/२०१७ वेळ – दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १७/१०/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१२) मा.राजू मिसाळ
१३) मा.अमित राजेंद्र गावडे
१४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.कडूसकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.खोत,मा.बहुरे,मा.राऊत, मा.दांगट-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे,मा.कांबळे, मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.भोसले,मा.मोरे,मा.पाटील,मा.घुबे-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.शिंपी-नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक २३) | चिखली से.क्र.१७ व १९ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविणे सदर प्रकल्पातील १०८ इमारतींचे Consent to Operate मिळणेबाबत... |
| विषय क्रमांक २४) | अजंठानगर, मिलिंदनगर,वेताळनगर,विठ्ठलनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या Consent to Operate च्या नुतनीकरणाची फी भरणेबाबत... |
| विषय क्रमांक २५) | मे.जयगणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगांव यांचे कचरा उचलणे व वाहतुक करणेचे कामासाठी मुदतवाढ मिळणेबाबत... |
| विषय क्रमांक २६) | प्र.क्र.१४ मध्ये सांस्कृतिक केंद्र करणे या कामासाठी वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून M/s.S.K.Associates यांची नेमणुक करणेबाबत- मा.वैशाली काळभोर, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक २७) | प्र.क्र.५ मधील विद्युत विषयक कामास आवश्यक तरतुद मिळणेबाबत – मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक २८) | प्र.क्र.४ मधील दिघी बोपखेल परिसरातील विद्युत विषयक कामास आवश्यक तरतुदी मिळणेबाबत – मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक २९) | पिं.चिं.मनपाच्या वापरात असलेल्या क गट भाग-२ मधील वाहनांच्या दुरुस्तीबाबत... |
| विषय क्रमांक ३०) | पिं.चिं.मनपाच्या वापरात असलेल्या ब गट व क गट भाग-१ मधील वाहनांच्या दुरुस्तीबाबत... |
| विषय क्रमांक ३१) | प्र.क्र.६ मधील मोशी येथील आरक्षण क्र.१/२१४ येथील उद्यान विकसित करणे या कामासाठी वास्तू विशारदाची नेमणूक करणेबाबत–मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३२) | प्र.क्र.५ मधील जाधववाडी येथील आरक्षण क्र.१/१४७ येथील उद्यान विकसित करणे या कामासाठी वास्तू विशारदाची नेमणूक करणेबाबत- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव... |

-----------

ठराव क्रमांक – ११५७ विषय क्रमांक – १
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग– ब क्षेत्रीय कार्यालय,आरोग्य
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/५/कावि/७०४/२०१७ दि.२२/०९/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात स्वच्छ भारत योजने अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ४४ पोर्टेबल टॉयलेट उपलब्ध करुन देणेकामी मे.भुतानी इंटरनॅशनल प्रा.लि. यांनी दिलेला

कमी दर म्हणजेच कोटेशन रक्कम १,७७,४७२/- (अक्षरी र.रू. एक लाख सत्याहत्तर हजार चारशे बहात्तर फक्त) या रकमेपेक्षा २४.३८% कमी प्रमाणे र.रु.१,३४,२००/-(प्रति सीट प्रति महा ३०५०/-) इतका दर सर्वात लघुत्तम असल्याने स्विकारणेबाबत क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.२९/०७/२०१७ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.भुतानी इंटरनॅशनल प्रा.लि. यांना इकडील क्र.बक्षेका/आरोग्य/५/कावि/६१८/२०१७ दि.२२/०८/२०१७ अन्वये कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५८ विषय क्रमांक – २

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/६४१/२०१७ दि.१२/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV07/06-2016 17 मधील भोसरी पी.एस २ पंप हाऊस येथे जुन्या तीनही पंपाचे आर्युमान संपलेले असल्याने सन २०१६-१७ मध्ये तेथील एक जुना पंप काढुन त्याजागी नविन सब मर्सिबल पंप बसविणेकामी मे. फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन यांचेकडुन नि.र.रु.३०,४३,४६९/- (अक्षरी र.रू.तीस लाख त्रेचाळीस हजार चारशे एकोणसत्तर फक्त) पेक्षा -०४.६०% कमी (सुधारित दरपृथ:करणासह) या दराने करुन घेणेस व त्यांचे सोबत करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५९ विषय क्रमांक – ३

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/६४२/२०१७ दि.१२/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV07/05-2016 17 मधील मनपाचे विविध मैलाशुध्दीकरण केंद्राची रंगसफेदी व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.नरळे विष्णु विठोबा यांचेकडुन नि.र.रु.२९,९७,५३४/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख सत्यान्न्व हजार पाचशे चौतीस फक्त) पेक्षा -१८.२७% कमी या दराने करुन घेणेस व त्यांचे सोबत करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११६०
विषय क्रमांक – ४
दिनांक – १७/१०/२०१७
विभाग –स्थापत्य क/ह मुख्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे
अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/३००/१७ दि.१२/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभाग क, ह मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ(१ ते 34) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११६१
विषय क्रमांक – ५
दिनांक – १७/१०/२०१७
विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)
सूचक – मा.अनुराधा गोफणे
अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ–मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/१/कावि/४४५/२०१७ दि.९/१०/२०१७

मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे नविन भोसरी रुग्णालयाकरिता आवश्यक असणारे Flash Autoclave खरेदीकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदेप्रमाणे M/s Esteem Industries या कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. ट्रिनीटी एन्टरप्रायजेस यांनी सादर केलेले लघुत्तम दर र.रु.१,९३,५००/- (अक्षरी र.रू. एक लाख त्र्यान्नव हजार पाचशे फक्त) साठी निविदा अट क्र.११ व १२ नुसार प्रथम वर्ष गॅरंटी/वॉरंटी व पुढील ३ वर्षाकरिता वार्षीक देखभाल व दुरूस्तीकामी १% एएमसी करिता करारनामा करुन व अनामत रक्कम घेऊन येणारे र.रु.३,८७,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११६२
विषय क्रमांक – ६
दिनांक – १७/१०/२०१७
विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ
अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५५५/१७ दि.६/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/६/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.१५ दत्तवाडी व आकुर्डी येथे स्थापत्य विषयक सुधारणांची कामे करणेकामी M/s.Sandbhor Construction नि.र.रू.२३,२४,९३५/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख चोवीस हजार नऊशे पस्तीस फक्त) पेक्षा २३.२५% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१७,८४,३८७/- पर्यंत काम

करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११६३ विषय क्रमांक – ७

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२६७/१७ दि.१०/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/५६/१७-१८ अन्वये प्रभाग क्र.३२ सँडविक कॉलनी (नवीन प्र.क्र.५) मध्ये मनपा इमारती व क्रिडांगणाची किरकोळ दुरुस्ती करणेकामी मे.डी.एम.एंटरप्रायजेस नि.र.रु.१४,९९,९१६/- (अक्षरी र.रु.चौदा लाख नव्यान्नो हजार नऊशे सोळा फक्त) पेक्षा १८.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१२,१५,०८२/- पर्यंत काम करुन घेणेस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११६४ विषय क्रमांक – ८

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/३८०/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Engineering Staff College of India Hydrabad यांनी Web Development using PHP & My SQL चे संगणक विषयक प्रशिक्षण हैद्राबाद येथे दि.१८ सप्टेंबर २०१७ ते दि.२२ सप्टेंबर २०१७ या कालावधीत आयोजीत केले होते. सदर प्रशिक्षणाकरीता माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील श्रीमती अनिता कोटलवार, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी आणि श्रीम.उज्वला गोडसे, कॉम्प्युटर प्रोग्रामर यांची दि.४/०९/२०१७ चे आदेशान्वये नेमणूक करणेत आली होती. त्यानुसार प्रशिक्षण शुल्क व निवास याकरीता येणा-या खर्चाची र.रु.५९,०००/- (१८% जी.एस.टी. सह) (अक्षरी रक्कम रूपये एकोणसाठ हजार फक्त) Engineering Staff College of India, Hydrabad यांना धनादेश क्र.७६३६०१ दि.१४/०९/२०१७ अन्वये आगाऊ अदा करणेत आले आहेत. प्रशिक्षणापोटी आलेल्या खर्चास व त्याकामी आगाऊ अदा केलेल्या रक्कमेचे समायोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११६५ विषय क्रमांक – ९
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – स्थापत्य नियोजन
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नियोजन/७६४/२०१७ दि.९/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर यांनी दिलेल्या निर्णयानुसार (रे. दरखास्त नं. ९८/२००५ चे दि.०६/०९/२०१७ चे निर्णयानुसार) मे. न्यायालयाकडे रक्कम रु.२,६४,२६५/- (अक्षरी र.रु.दोन लाख चौसष्ठ हजार दोनशे पासष्ठ फक्त) मे.न्यायालयाकडे भरणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११६६ विषय क्रमांक – १०
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ – मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/१६४६/१७ दि.१२/१०/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे अटीस शर्तीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११६७ विषय क्रमांक – ११
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – दूरसंचार
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/३/कावि/१३/२०१७ दि.१२/१०/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे दूरसंचार विभागाकडे तीन VHF वायरलेस फ्रिक्वेंसीज भारत सरकारचे संचार मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत पुरविणेत आलेल्या असून त्याचे नुतणीकरण दिनांक ३१/१२/१७ पर्यंत करणेत आलेले आहे. दि.१/१/२०१८ ते ३१/१२/२०१८ या कालावधीपर्यंतचे खालीलप्रमाणे लायसन्स नुतणीकरण करणे आवश्यक आहे.

१) परवाना क्र. L- 1329
२) परवाना क्र. L- 1330
३) परवाना क्र. L – 1475

सदरचे नुतणीकरणाची फी डिंसेंबर २०१७ पुर्वी अदा करणे आवश्यक असून नुतणीकरण फी बाबत योग्य ती माहीती घेणेसाठी श्री.नरोन्हा थॉमस, वायरलेस इनचार्ज यांना नवी दिल्ली येथे जाणे आवश्यक असलेने त्यांना जाणे-येणेसाठी विमानाने प्रवास करणेस व येणा-या खर्चास तसेच उपरोक्त तीन परवाने नुतणीकरण करणेसाठी येणा-या फी ची रक्कम भारत सरकारचे संचार मंत्रालय, नवी दिल्ली यांस डिमांड ड्राफ्टने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११६८ विषय क्रमांक – १२

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय विद्युत कार्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/वि/६४९/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.न.पाच्या इ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत मोशी मनपा भवन उपविभागात नव्याने बसविणेत आलेल्या रस्त्यावरील दिवाबत्तीसाठी अथवा सध्या कार्यरत फिडर पिलरवरील वीज भार कमी करणेसाठी नविन वीजपुरवठा/वीजमिटर घेणे आवश्यक आहे. याकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे वीज मिटरची मागणी केली असता त्यांनी १ ते ३ असे तीन फर्म कोटेशन दिले आहेत. नविन वीज पुरवठा/वीज मिटरसाठी सदर फॉर्म कोटेशन मध्ये नमूद केलेल्या रकमा म.रा.वि.वि. कंपनीस अदा करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी वीज मिटर बसविणेकामी म.रा.वि.वि. कंपनीकडून दि.१९/१/२०१७ चे एकूण ३ वीज मिटरसाठी रक्कम रू.५,२६९/- प्रती कोटेशन प्रमाणे एकूण रक्कम रूपये १५,८०७/- (अक्षरी र.रू. पंधरा हजार आठशे सात फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११६९ विषय क्रमांक – १३

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय,जलनिःसारण

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/जनि/कावि/३२१/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

फ क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी मे. सुरज कॉन्ट्रक्टर हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार सदर निविदेचा कालावधी ५ वर्षाचा असुन सुरुवातीस संदर्भ क्र.५ अन्वये कामाचे आदेश २ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल या प्रमाणे अटी व शर्ती मध्ये नमुद करणेत आलेले आहे. त्यानुसार सदरच्या निविदेस मा.स्थायी समितीने ठराव क्र.१०७३५, दि.२१/०२/२०१५ अन्वये मंजूरी दिलेली आहे. मा.स्थायी समिति ठराव नुसार सदर कामाचे निविदा रक्कम रूपये

१,०५,३९,९००/- साठी ४.८४% कमी या दराने म्हणजेच रक्कम रूपये १,००,२९,७६९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच सुरूवातीस एक वर्ष कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यानंतर ठेकेदार मे. सुरज कॉन्ट्रक्टर यांनी सदरचे काम समाधानकारक रित्या पुर्ण केले असल्याने मा. स्थायी समितीने सदर कामास पुढील ५ वर्षांपैकी दुस-या वर्षाकरीता ठराव क्र.१६५९३, दि.२८/०६/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापि सदर ठेकेदार यांचे ड क्षेत्रिय कार्यालयात काम करीत असताना आवश्यक त्या उपाययोजना करण्यास आवश्यक त्यासुरक्षा उपाययोजना करण्यास असमर्थ ठरल्याचे द्विसदस्यीय समितीने आक्षेप नोंदविला आहे. त्यामुळे मे.सूरज कॉन्ट्रॅक्टर यांची निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविणे योग्य होणार आहे. त्यामुळे पुढील निविदा कार्यवाही करण्यास लागणारा कालावधी विचारात घेता सदर कामास दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ व त्यानुसार येणारा खर्च र.रु.८०,००,०००/- (अक्षरी र.रू.ऐंशी लाख फक्त) पर्यंतच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७०                                    विषय क्रमांक – १४

दिनांक – १७/१०/२०१७                                  विभाग – औ.प्र.संस्था (मुलींची) कासारवाडी

सूचक – मा.कैलास बारणे                               अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसंमु/१/कावि/२६९/२०१७ दि.१२/१०/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमूद अ.क्र.१ ते ५ मानधन निदेशकांना मे.उच्च न्यायालय येथे महानगरपालिका विरूध्द दाखल दावा क्र.११६५१/२०१६ नुसार मे.उच्च न्यायालय यांचे अंतरीम आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दिनांक २३/१०/२०१७ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दिनांक २४/१०/२०१७ ते दिनांक २३/०४/२०१८ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता आयटीआय मोरवाडी येथील मानधन निदेशकाप्रमाणे दरमहा एकत्रित र.रू.२५,०००/- मानधनावर हंगामी तात्पुरत्या स्वरूपाची नेमणूक देणेकामी तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.५२३दिनांक १४/०६/२०१७ अन्वये आयटीआय मोरवाडी येथील मानधन निदेशकांना वाढीव मानधन देणे बाबत ठराव मंजूर झालेला आहे. तसेच मा. आयुक्त सो यांच्या दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये वाढीव मानधनास मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने औ.प्र.संस्था (मु.) कासारवाडी येथील मानधन निदेशकांना दिनांक १४/०६/२०१७ पासून वाढीव मानधन फरक अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७१ विषय क्रमांक – १५
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/१३४९/२०१७ दि.११/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयातील मनोविकृती चिकित्सक व सायकीयाट्रीक कौन्सीलर ही कायमस्वरूपी वेतनश्रेणीतील पदे रिक्त झालेली आहेत. सदर पदावर काम करणारे डॉ. किशोर गुजर मनोविकृती चिकित्सक यांनी दि.३१/०८/२०१७ रोजी मनपा सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली आहे. तसेच श्रीम. वर्षा पिंगळे यांनी सेवेचा राजीनामा दिलेला आहे. सदर रिक्त पदे जादा कालावधीकरीता रिक्त ठेवणे उचित होणार नसल्याने सदरचे रिक्त पदे तातडीने अस्थायी स्वरूपात एकत्रित मानधनावर भरणेकामी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कळविलेले आहे. उक्त दोन्ही रिक्त पदापैकी मनोविकृत्ती चिकित्सक हे पद कायमस्वरूपी वेतनश्रेणीत भरणेकामी प्रशासन विभागाने जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द केलेली आहे. प्रशासन विभागामार्फत सदर पद भरणेस काही कालावधी लागणार असल्याने व रूग्णालयाचा वाढता व्याप पाहता आवश्यक असणारे मनोविकृत्ती चिकित्सक व सायकॅट्रीक कौन्सीलर ही पदे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर मा.स्थायी समिती सभेचे मंजुरीने भरणे आवश्यक आहे. सदर पदाकरीता मनोविकृती चिकित्सक ची शैक्षणिक पात्रता MD (psy) अशी असून त्याकरीता एकत्रीत मानधन र.रू.६०,०००/- व सायकीयाट्रीक कौन्सीलर या पदाची शैक्षणिक पात्रता BA psychology अशी आहे व त्याचे एकत्रित मानधन र.रू.१५०००/- देवून ही पदे तात्पुरत्या स्वरूपात सहा महिने कालावधीकरीता मानधनावर जाहीरात देऊन भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७२ विषय क्रमांक – १६
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२७१/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८६/१/१६-१७ पुणे आळंदी रस्त्यालगत स.नं.७८ येथील समुह शिल्पाचे उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एस एस साठे नि.र.रु.९,६८,२८,७६२/- (अक्षरी र.रु.नऊ कोटी अडुसष्ठ लाख अठ्ठ्वीस हजार सातशे बासष्ठ) पेक्षा ४.३०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.९,२६,६५,१२५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट

दरानुसार फरकाची रक्क्म अदा/ वसुल करणे बंधनकारक -राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७३ विषय क्रमांक – १७
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/१२७/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८०/१-२०१६-१७ अन्वये थेरगाव प्रभाग क्र.५० मध्ये प्रसुमधाम शेजारी १८ मी.डी.पी. रस्त्यास थेरगाव चिंचवड पुल बांधणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांनी नि.र.रू.२५,१९,०४,००१/-(अक्षरी र.रू. पंचवीस कोटी एकोणीस लाख चार हजार एक फक्त) पेक्षा १४.००% जादा या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२८,७१,७०,५६१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहीलया अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७४ विषय क्रमांक – १८
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.राजू मिसाळ
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/०३/कावि/११३९/२०१७ दि.९/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सर्वासाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत Selection of Agency for City Level Technical Cell (CLTC) Under Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) चे निविदा नोटीस क्र.२/२०१६-१७ करीता मे.क्रिसिल रिस्क अन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांची एकच निविदा प्राप्त झालेली आहे. मे.क्रिसिल रिस्क अन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि.यांनी सादर केलेल्या एकत्रित (Lumpsum) दर र.रु.२,३८,३७,४८२/- दर कमी करुन म्हणजेच एकत्रित (Lumpsum) दर र.रु.२,३७,७७,४८२/- (अक्षरी र.रु.दोन कोटी सदोतीस लाख सत्त्याहत्तर हजार चारशे ब्याऐंशी फक्त) सर्व करासहीत (३.८३%कमी दराने) काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. त्यानुसार Selection of Agency for City Level Technical Cell (CLTC) Under Pradhan Mantri Awas Yojana ( PMAY) करीता मे.क्रिसील रिक्स अन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांचे प्राप्त झालेल्या दरानुसार एकत्रित (Lumpsum) र.रु.२,३७,७७,४८२/- चे खर्चास मान्यता देणेस व त्यांचे समवेत ३६ महीने

कालावधीसाठी करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७५ विषय क्रमांक – १९
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/१३५०/२०१७ दि.११/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामधील दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता नेमणुक केलेल्या प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ मधील विविध कंन्सलटंट पदावरील उमेदवारांची मुदत दि.१०/११/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना पुढील सहा महिनेकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७६ विषय क्रमांक – २०
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – लेखा
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/९०८८/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील अ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत क्षेत्रिय अधिकारी यांनी दि.४/१०/२०१७ चे प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या अंदाज अ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य मुख्यालयाकडील काही कामांना बिले अदायगी साठी तरतुद कमी पडलेली असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे विभागाअंतर्गत भांडवली र.रू.२१,३७,६५१/- वर्गिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७७ विषय क्रमांक – २१
दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – दूरसंचार
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/१/कावि/३१६/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.पदाधिकारी, नगरसदस्य, अधिकारी, कर्मचारी तसेच मनपाचे विविध कार्यालयात कार्यालयीन कामकाजाकरिता मनपाने मे.आयडीया सेल्युलर लि. यांची मोबाईल सेवा पूरवलेली आहे. मा.सभापती अ, ब, क, ड, ई, फ प्रभाग समिती यांना मोबाईल वापराची अधिकतम

मासिक मर्यादा र.रू.३०००/- निश्चित करणेत आली आहे.नव्याने निर्माण करणेत आलेल्या 'ग' प्रभाग व 'ह' प्रभागाचे मा.सभापती यांना कार्यालयीन कामकाजासाठी उपरोक्त प्रमाणे मोबाईल सुविधा पुरविणे आवश्यक आहे. 'ग' प्रभाग व 'ह' प्रभागाचे मा. सभापती यांस मोबाईल वापराची अधिकतम मासिक मर्यादा प्रस्तावात नमूद केले प्रमाणे निश्चित करून येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११७८ | विषय क्रमांक – २२

दिनांक – १७/१०/२०१७ | विभाग – लेखा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/९०८७/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या अंदाज अ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य मुख्यालयाकडील नविन प्रभाग क्र.१०,१४,१५,१९ मध्ये प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने, त्यामधील काही चालू कामांना व काही विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करून, निविदा कार्यवाही करणेसाठी, प्रथम प्राधान्याने करावयाचे कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे. तसेच जी कामे दुय्यम प्राधान्याने करावयाची आहेत. अशा कामांसाठी अपु-या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्या कामांच्या तरतुदी कमी करुन, ती रक्कम प्रथम प्राधान्याने करावयाचे प्रस्तावात नमूद प्रमाणे कामांसाठी र.रू.३,५२,४४,०००/- (अक्षरी र.रू.तीन कोटी बावन्न लाख चव्वेचाळीस हजार फक्त) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –**</u>

ठराव क्रमांक –११७९ | विषय क्रमांक – २३

दिनांक – १७/१०/२०१७ | विभाग–स्थापत्य EWS प्रकल्प

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/EWSप्र/४७३/२०१७ दि.१६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिखली से.क्र.१७ व १९ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविणे या प्रकल्पातील १०८ इमारतींचे Consent to Operate चे नुतनीकरण करणेकरिता र.रु.२६,७५,०२५/- इतकी फी DD द्वारे Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Pune यांचेकडे अदा करणेस तसेच पुढील ३१

इमारतींकरिता Consent to Operate मिळणेकामी र.रु.४,८९,२४०/- इतकी फी RTGS द्वारे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८० विषय क्रमांक – २४

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग– स्थापत्य BSUP प्रकल्प

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/BSUP प्र/४५४/२०१७ दि.१३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

JnNURM-BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत अजंठानगर, मिलिंदनगर, वेताळनगर, विठ्ठलनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतींकरीता MPCB कडून Consent to Operate च्या नुतनीकरणाकरीता लागणारी फी र.रु.९,७५,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख पंच्याहत्तर हजार फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८१ विषय क्रमांक – २५

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग– ड क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/७१२/२०१७ दि.१६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व कचराकुंड्या, रस्त्याचे, गटर्सच्या कडेचे कच-याचे ढीग, मोकळ्या जागेतील कच-याचे ढीग उचलणे व त्याची वाहतूक करुन भोसरी स्थानांतर केंद्र अथवा मोशी कचरा डेपो येथे टाकणे या कामासाठी निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६ अन्वये आरोग्य विभाग ड क्षेत्रिय कार्यालयामार्फत निविदा प्रसिद्ध करुन कामाचे दर मागविणेत आले होते. त्यानुसार मे. जयगणेश एंटरप्रायजेस यांनी भोसरी कचरा स्थानांतर केंद्रासाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४२५०/- व मोशी कचरा डेपोसाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४४५०/- या दराने ९ वाहने पुरवून काम करणेस मा.स्थायी समिती सभा यांनी ठराव क्र.१८०४०, दि.१५/१०/२०१६ अन्वये मान्यता दिल्याने त्यांचेशी दि.५/१०/२०१६ रोजीचा सिलबंद करारनामा करणेत येवून मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश क्र.डक्षे/३/कावि/८०१/२०१६, दि.१७/१०/२०१६ अन्वये मे.जयगणेस एंटरप्रायजेस यांना कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. त्यानंतर मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३२५ दि.३/५/२०१७ अन्वये दि.२२/५/२०१७ पासून दि.१६/१०/२०१७ अखेर मुळ करारनाम्यातील अटी शर्ती कायम ठेवून उक्त दरानेच दोन वाढीव वाहने पुरविणेस मान्यता देणेत आली असून दोन वाढीव वाहने पुरविणेकामी मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने आदेश क्र.डक्षे/३/कावि/३३२/२०१७, दि.२२/७/२०१७ देणेत आलेला आहे. त्यानुसार सद्यस्थितीत मे.जयगणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगांव हे ड क्षेत्रिय कार्यालयाचे

कार्यक्षेत्रात कचरा उचलणे व वाहतुक करणे या कामासाठी एकुण ११ टिपर/ट्रक वाहने पुरवीत आहेत. सदर कामाची मुदत दि.१६/१०/२०१७ रोजी संपत आहे. त्यामुळे दि.१७/१०/२०१७ पासून सदर कामास अडचण निर्माण होणार आहे. आरोग्य निरिक्षक/मुख्य आरोग्य निरिक्षक, कचरा वाहतुक विभाग क्र.डक्षेका/कवा/कावि/१४१०/२०१७, दि.२५/९/२०१७ अन्वये सदर कामाची मुदत दि.१६/१०/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधी करीता निविदा प्रक्रिया होईपर्यंत मुदतवाढ मिळणेकामी कळविले आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कचरा उचलणे व वाहतुक करणे या कामासाठी दि. ५/१०/२०१६ रोजी करणेत आलेला सिलबंद मुळ करारनाम्यातील अटी शर्ती कायम ठेवून दि.१७/१०/२०१७ ते दि.१६/१/२०१८ अखेर अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी यापैंकी प्रथम येणा-या कालावधीपर्यंत मे.जयगणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगांव यांनी भोसरी कचरा स्थानांतर केंद्रासाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,२५०/- व मोशी कचरा डेपोसाठी प्रतिदिन प्रति वाहन दोन खेपांसाठी ४ मजूर व वाहनचालकासह र.रु.४,४५०/- या दराने एकुण ११ टिपर/ट्रक वाहने पुरविणेस व याकामी तीन महिन्यांकरीता अपेक्षीत खर्च र.रु.४५,००,०००/- या येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८२ विषय क्रमांक – २६

दिनांक – १७/१०/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ– मा.वैशाली काळभोर, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

आकुर्डी येथील जुनी व नादुरुस्ती करसंकलन इमारत पाडून येथे नविन सांस्कृतिक केंद्र इमारत बांधणेचा प्रस्ताव मा.आयुक्त सो. यांनी दि.३०/०६/२०१६ रोजी मंजूर केला आहे. सदर कामासाठी वास्तुविशारद (आर्किटेक्ट) म्हणुन काम करण्यासाठी M/s.S.K.Associates यांनी दि.११/०९/२०१७ चे पत्रान्वये संमती दर्शविली आहे. M/s.S.K.Associates यांची मनपावरील आर्किटेक्ट पॅनलमध्ये नेमणूक झालेली असून सदर प्रकारच्या कामाचा त्यांना पुरेसा अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी मनपास चांगली सेवा दिलेली आहे. सदर काम करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे,प्लॅनिंग व डिझाईन करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदा पुर्व कार्यवाही पर्यंत सर्व कामे करणे यासाठी M/s.S.K.Associates यांची वास्तुविशारद म्हणुन नेमणुक करण्यास व त्यांना मनपा मान्य दराने कामाच्या निविदा रकमेच्या २.००% + सेवाकर, तसेच पी.एम.सी. (प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार) निविदा पश्चात कामासाठी निविदा रकमेच्या १.३५% + सेवाकर याप्रमाणे मा.आयुक्त सो. यांच्याकडील दि.१०/०८/२०१७ मंजूर प्रस्तावाप्रमाणे फी अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८३ विषय क्रमांक – २७

दिनांक – १७/१०/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ– मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्र.क्र.५ मधील विद्युतविषयक कामास खालीलप्रमाणे तरतूद देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | लेखाशिर्ष | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|
| १. | नविन प्र.क्र.५ मध्ये आवश्यकतेनुसार प्रकाश व्यवस्था करणे, दिव्यांचे नुतनीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | ५०००००० | ३०००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८४ विषय क्रमांक – २८

दिनांक – १७/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ– मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्र.क्र.४ मधील दिघी बोपखेल परिसरातील विद्युतविषयक कामास खालीलप्रमाणे तरतूद देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | लेखाशिर्ष | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|
| १. | नविन प्र.क्र.४ मध्ये आवश्यकतेनुसार प्रकाश व्यवस्था करणे, दिव्यांचे नुतनीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | ५०००००० | ३०००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८५ विषय क्रमांक – २९

दिनांक – १७/१०/२०१७ विभाग – वाहन दुरुस्ती कार्यशाळा

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/४/कावि/१००७/२०१७ दि.१७/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाकडील सर्व विभागाच्या वापरामध्ये आज रोजी एकूण ८३६ इतकी वाहने आहेत. सदरच्या वाहनामध्ये कार, सुमो, रुग्णवाहीका, लहान मोठे ट्रक, टँकर, अग्निशामक वाहने पा.पु., उद्यान तसेच आरोग्य विभागाकडे वेगवेगळ्या प्रकारची वाहने आहेत. या वाहनांची

गटवार पद्धतीने रचना केली असून क गट भाग- २ मध्ये खालील वाहनांचा समावेश करणेत आलेला आहे.

**<u>क गट भाग-२</u>** :- टाटा ए.सी.ई., डिसिल्टींग, मलजेट हाई प्रेशर जेटिंग व डिटॅंज व्हेईकल, इ. वाहनांचा समावेश आहे.

सदर वाहनांची सन २०१७ ते २०२० या तीन वर्ष कालावधीकरीता दुरुस्ती कामी एजन्सी निश्चित करणेकामी ई-निविदा नोटीस क्र.२/२०१७-१८ वर्तमानपत्रे तसेच ऑनलाईन पद्धतीने प्रसिद्ध करुन दर मागविणेत आलेले असून सदरचे निविदा दर दिनांक २०/०९/२०१७ रोजी उघडणेत आलेली आहेत.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता क गट भाग-२ मधील लघुत्तम दराचे निविदाधारक मे.श्री.बालाजी गॅरेज यांचे दर स्विकृत करुन त्यांचे समवेत सन २०१७ ते २०२० या तीन वर्ष कालावधीकरीता करारनामा करुन घेवून कामे करुन घेणेस व त्याकामी प्रति वर्षी येणारे र.रु.१,१५,००,०००/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८६ | विषय क्रमांक – ३०

दिनांक – १७/१०/२०१७ | विभाग – वाहन दुरुस्ती कार्यशाळा

सूचक – मा.हर्षल ढोरे | अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/४/कावि/१००८/२०१७ दि.१७/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाकडील सर्व विभागाच्या वापरामध्ये आज रोजी एकूण ८३६ इतकी वाहने आहेत. सदरच्या वाहनामध्ये कार, सुमो, रुग्णवाहीका, लहान मोठे ट्रक, टॅंकर, अग्निशामक वाहने पा.पु., उद्यान तसेच आरोग्य विभागाकडे वेगवेगळ्या प्रकारची वाहने आहेत. या वाहनांची गटवार पद्धतीने रचना केली असून ब गट व क गट भाग-१ मध्ये खालील वाहनांचा समावेश करणेत आलेला आहे.

**<u>ब गट</u>** :- टाटा सुमो (सर्व प्रकारची वाहने), टाटा मोबाईल, टेम्पो ट्रॅव्हलर व विंगर जेसीबी इ. वाहनांचा समावेश आहे.

**<u>क गट भाग-१</u>** :- टाटा ४०७,६०८, ७०९, ७१२ EX, ट्रॅक्टर ट्रॉली, फिरते शौचालय इ. वाहनांचा समावेश आहे.

सदर वाहनांची सन २०१७ ते २०२० या तीन वर्ष कालावधीकरीता दुरुस्ती कामी एजन्सी निश्चित करणेकामी ई-निविदा नोटीस क्र.२/२०१७-१८ वर्तमानपत्रे तसेच ऑनलाईन पद्धतीने प्रसिद्ध करुन दर मागविणेत आलेले असून सदरचे निविदा दर दिनांक २०/०९/२०१७ रोजी उघडणेत आलेली आहेत.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता ब गट व क गट भाग-१ मधील लघुत्तम निविदाधारक मे.नेहा ऑटोमोटिव्ह यांचे निविदा रक्कमेपेक्षा ४% कमी (दोन्ही गटांकरीता) दर प्राप्त झालेले आहेत. (ब गटासाठी नि.र.रु.८८,००,०००/- व क गट भाग-१ साठी नि.र.रु.८०,००,०००/-) सदर प्राप्त झालेल्या लघुत्तम दराचे निविदाधारक मे.नेहा ऑटोमोटिव्ह यांचे दर स्विकृत करुन त्यांचे समवेत (ब गट व क गट भाग-१) सन २०१७ ते २०२० या तीन वर्ष कालावधीकरीता करारनामा

करुन घेवून कामे करुन घेणेस व त्याकामी प्रति वर्षी येणारे र.रु.८८,००,०००/- (ब गटासाठी) व र.रु.८०,००,०००/- (क गट भाग-१ साठी) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८७ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १७/१०/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ– मा. आशा धायगुडे-शेंडगे, मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.०६ मधील मोशी येथील आरक्षण क्र.१/२१४ येथील जागा आहे. सदर जागेवर उद्यान विकसित करण्यात येणार आहे. उद्यानाचे नकाशे, अंदाजपत्रक तयार करणे यासाठी म.न.पा.च्या पॅनेल वरील वास्तू विशारदाची नेमणूक करणे आवश्यक आहे. म.न.पा. पॅनेलवरील वास्तूविशारद मे.शिल्पी आर्किटेक्ट अँन्ड प्लॅनर्स (पारस नेत्रगावकर) हे सदरचे काम करण्यास तयार आहेत. तरी त्यांची विषयांकित कामास वास्तूविशारद म्हणून नेमणूक करण्यास तसेच म.न.पा. प्रचलित दरानुसार म्हणजेच रक्कम रुपये ५० लक्ष पर्यंतचे कामास ३% फी व रक्कम रुपये ५० लक्ष पुढील कामास २% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११८८ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १७/१०/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ– मा. आशा धायगुडे-शेंडगे, मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.०५ मधील जाधववाडी येथील आरक्षण क्र.१/१४७ येथील जागा आहे. सदर जागेवर उद्यान विकसित करण्यात येणार आहे. उद्यानाचे नकाशे, अंदाजपत्रक तयार करणे यासाठी म.न.पा.च्या पॅनेल वरील वास्तू विशारदाची नेमणूक करणे आवश्यक आहे. म.न.पा. पॅनेलवरील वास्तूविशारद मे.शिल्पी आर्किटेक्ट अँन्ड प्लॅनर्स (पारस नेत्रगावकर) हे सदरचे काम करण्यास तयार आहेत. तरी त्यांची विषयांकित कामास वास्तूविशारद म्हणून नेमणूक करण्यास तसेच म.न.पा. प्रचलित दरानुसार म्हणजेच रक्कम रुपये ५० लक्ष पर्यंतचे कामास ३% फी व रक्कम रुपये ५० लक्ष पुढील कामास २% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>निर्णय</u>** – १) सगळ्या विभागप्रमुखांकरिता निर्देश आहेत की, त्यांनी मुदतवाढीचे विषय स्थायी समितीपुढे आणावेत. मुदत संपली आहे पण प्रशासकीय मान्यता आहे असे देखील विषय दोन आठवड्यांनंतर होणा-या स्थायी समिती सभेपुढे आणावेत. ही शेवटची संधी देण्यात येत आहे. यापुढे संबंधितांवर कारवाई करणेत येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. ज्या कामांची मुदत संपली आहे, त्या कामांच्या निविदा तातडीने काढाव्यात.

२) शहरातील सर्व फटाक्यांच्या दूकानांवर लक्ष ठेवावे, अशी अधिका-यांना सूचना आहे. सर्व नगरसदस्य, अधिकारी-कर्मचारी यांना दिपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा देणेत येत आहेत.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/३१/२०१७
दिनांक - १८/१०/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.